**" नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**

शेगांव नगरपरिषद, जि.बुलडाणा
सन २०२३-२०२४, लेखाशिर्ष (२२१७ ९५१८) खाली
रक्कम रू. १५.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-नपाह-२०२३/प्र.क्र.३१६(३)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २२ जून, २०२३**

**वाचा :-**

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र. २४/नवि-१६. दिनांक २७ जून, २०१२, दिनांक १५ एप्रिल, २०१३.
(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०२१/प्र.क्र.१७ / नवि-१६. दिनांक २४ जानेवारी, २०२२.
(३) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे पत्र क्र. कार्या-०४/कलि-२/नपाप्र/कावि/३५/२०२३ दिनांक २७ मार्च, २०२३.
(४) मुख्यधिकारी, शेगांव नगरपरिषद यांचे पत्र क्र. कार्या-०४/कलि-२/नपाप्र/कावि/ ३५/२०२३ दिनांक २२ जून, २०२३.
(५)वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३. दिनांक १२ एप्रिल, २०२३.

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी विशेष अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहेत. तसेच संदर्भाधीन क्रमांक (२) येथील शासन निर्णयान्वये निधीच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत. संदर्भाधीन क्र. (३) व (४) येथील पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलडाणा/ मुख्यधिकारी, शेगांव नगरपरिषद यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. संदर्भाधीन क्रमांक (५) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नगरपालिका /नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा

पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करीता शेगांव नगरपालिकेच्या हद्दवाढ क्षेत्रातील विविध विकास कामांकरीता "अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर" निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेअंतर्गत संदर्भाधीन क्रमांक (३) व (४) अन्वये जिल्हाधिकारी, बुलडाणा/ मुख्यधिकारी शेगांव यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शेगांव नगरपालिकेच्या रक्कम रु.१५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा कोटी मात्र) प्रस्तावास मान्यता देऊन राज्य शासनाचा १००% हिस्सा म्हणून रुपये १५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी मात्र) इतका निधी यासोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांना वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहिल.

३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयामधील (२) (ii) च्या तरतूदीनुसार राज्य शासन हिस्स्याच्या प्रमाणात नगरपालिकेने त्यांच्या हिस्स्याचा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याबाबतची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी. वितरीत करण्यात येणारा निधी संबंधित नगरपालिकेच्या स्वतंत्र खात्यात ठेवण्यात यावा.

४. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा संबधित **"नगरपरिषद"** राहील.

५ सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी. कोणत्याही परिस्थतीत कामांची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करून दिले जाणार नाही. प्रत्येक काम किमान रु. १० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी. प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबंधित मुख्याधिकारी यांची राहील.

६. ई- निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

७. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई- निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम / अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या

ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

८. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

९. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात नगरपालिकेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांची राहील. तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१०. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

११. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे- चिखली नगरपालिकेस वितरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, बुलडाणा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे नियंत्रक अधिकारी म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून सदरच्या कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य " या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता तसेच, प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१३. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या चिखली नगरपालिकेस या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२०२३ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१४. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी, असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१५. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये. असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१६. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबंधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा जिल्हाधिकारी यांनी थेट वळता करू नये.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- १०१५/प्र.क्र.१८/ अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०. ०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून, २००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण- ११९८/ प्र.क्र.३०/न. वि. - १४, दिनांक १२ मार्च, २०१८, दिनांक ४ जून, २०१८ व दिनांक ९ ऑगस्ट, २०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दिनांक ०१ जून, २०१९, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२०, दिनांक ११ जून, २०२०, दिनांक २१ मे, २०२१, दिनांक २८ मार्च, २०२२, अन्वये कार्यवाही करावी.

१९. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/ अर्थ- ३, दिनांक १२ एप्रिल, २०२३ सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील लागू होणा-या बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

२०. यासंबंधीचा खर्च मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, ८० सर्वसाधारण, नगर विकास, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (१३) नगरपालिका / नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य, (२२१७ ९५१८) ३१, सहाय्यक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/ अर्थ- ३, दिनांक १२ एप्रिल, २०२३ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२२/०६/२३

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. विभागीय आयुक्त, अमरावती
४. जिल्हाधिकारी, बुलडाणा
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, बुलडाणा
११. जिल्हा प्रशासन अधिकारी, बुलडाणा
१२. मुख्याधिकारी, शेगांव नगरपरिषद, जि. बुलडाणा
१३. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक-नपाह-२०२३/प्र.क्र.३१६(३)/नवि-१६, दिनांक २२ जून, २०२३
## सोबतचे विवरणपत्र
## शेगांव नगरपरिषद क्षेत्रातील कामे

| अ.क्र. | कामांचे नाव | रक्कम रूपये लक्ष |
|---|---|---|
| १ | शेगांव शहरात डि. पी रोड (टप्पा-१) विकसीत करणे. | ५००.०० |
| २ | प्रभाग क्र. १४ मधील हद्दवाढ झालेल्या क्षेत्रामधील भुगटार योजना टप्पा क्र. ३ व अमृत २.० पाणी पुरवठा योजना मधील रोड पुनर्भरणाच्या रुंदीव्यतिरिक्त रोड विकासीत करणे. | ७१०.०० |
| ३ | प्रभाग क्र. १४ मधील हद्दवाढ झालेल्या क्षेत्रामधील झाडेंगाव फाटा ते ओपन स्पेस व जवळील परिसरामध्ये रस्ता डांबरीकरण करणे. | २५.०० |
| ४ | प्रभाग क्र. १४ मधील हद्दवाढ झालेल्या क्षेत्रामधील राजेश्वर कॉलनी ते एस.टी.पी. प्लांट २ पर्यंत पावसाळी कॉंक्रीट नाले बांधकाम करणे. | २४०.०० |
| ५ | शेगाव नगरपरिषद अंतर्गत शेत सर्वे क्र. ३०६ मधील ओपन स्पेस विकसीत करणे. | २५.०० |
| | **एकुण रक्कम रुपये (लक्ष)** | **१५००.००** |